**यातील अर्जदार आरोपींचे जामीन अर्जास हरकत करणेची कारणे :-**

१) दाखल गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा मारहाणीचा गुन्हा आहे.

२) दाखल गुन्हयाचे अनुषंगाने **(१)** इस्लामपूर पोलीस ठाणे गु.रजि.नं- ४५८/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ११८(२),११५(२),३५२,३५१(२),३५१(३),३(५) **(२)** इस्लामपूर पोलीस ठाणे गु.रजि.नं- ४५९/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ११८(१),११५(२),३५२,३५१(२),३५१(३),३(५) अन्वये मारहाणीचे गुन्हे परस्परविरोधी दाखल असून दाखल गुन्हयाचा सखोल तपास चालू आहे.

३) दाखल गुन्हयातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचेकडे तपास चालू आहे.

४) दाखल गुन्हयातील जखमी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार राजाराम सदाशिव निकम यांचे जिल्हा रूग्णालय, सांगली यांचेकडून इन्जूरी सर्टिफिकेट प्राप्त करून अधिक तपास करणे आहे.

५) अर्जदार आरोपी व फिर्यादी यांची शेती एका ठिकाणी असल्याकारणाने अर्जदार आरोपीस जामीनावर सोडल्यास तो पुन्हा अशाच प्रकारचा गुन्हा करण्याची दाट शक्यता आहे.

६) दाखल गुन्हयातील साक्षीदार हे अर्जदार आरोपी यांचे भावकीतील व गावातील असल्याने अर्जदार आरोपी यांना जामीनावर सोडल्यास ते फिर्यादी व साक्षीदार यांचेवर दबाव आणून तपासामध्ये अडथळा निर्माण करण्याची दाट शक्यता आहे.

७) अर्जदार आरोपी यांना जामीनावर सोडल्यास राहते गावामध्ये व परिसरामध्ये दहशतीचे वातावरण करण्याची दाट शक्यता आहे.

८) अर्जदार आरोपीस जामीनावर सोडल्यास ते मा.न्यायालयात आवश्यकता वाटेल तेव्हा हजर राहण्याची दाट शक्यता वाटत नाही.

९) दाखल गुन्हयाचा अधिक तपास करून मा.न्यायालयात मुदतीमध्ये दोषारोपपत्र दाखल करणे आहे.

तरी वरील कारणांसाठी यातील नमूद अर्जदार आरोपींचा जामीन अर्ज नामंजूर होणेस विनंती आहे.

मा.सादर व्हावे.

( विकास जाधव )
पोलीस उपनिरीक्षक
इस्लामपूर पोलीस ठाणे

मार्फत -
मा. पोलीस निरीक्षक सो,
इस्लामपूर पोलीस ठाणे

दाखल व पाहून रवाना

**पोलीस निरीक्षक**
**इस्लामपूर पोलीस ठाणे**

APP

Adopted by
21.12.2024

प्रत मिळाली
AAW. S. U. Sande
21/12/24

फौ-०५
Cri. Bail Appl. 130/24

जावक क्र- ७५६७ /२०२४
इस्लामपूर पोलीस स्टेशन
दि- २१/१२/२०२४

**प्रति,**

मे. जिल्हा व सत्र न्यायाधीश सो,
इस्लामपूर

यांना सविनय सादर,

**प्रतिवेदक** :- विकास जाधव, पोलीस उपनिरीक्षक, इस्लामपूर पोलीस ठाणे

**विषय** :- अर्जदार आरोपी नामे रमेश शंकर निकम व अक्षय रमेश निकम यांचे जामीन अर्जास हरकत असलेबाबत.

महोदय,४

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की,

| | |
|---|---|
| **पोलीस ठाणे** | इस्लामपूर पोलीस ठाणे |
| **गु.र.नं. कलम** | ४५८/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ११८(२),११५(२),३५२,३५१(२),३५१(३),३(५) |
| **फिर्यादी** | सौ.अर्चना राजाराम निकम वय-३३ वर्षे व्यवसाय- शेती रा- माळी मळा, जुने खेड, ता-वाळवा जि- सांगली |
| **आरोपीचे नाव व पत्ता** | १) रमेश शंकर निकम वय-५५ वर्षे व्यवसाय- शेती रा- गणपतराव खेडकर आळी, नवेखेड ता-वाळवा जि-सांगली मो.नं- ७७९८३६८३८४<br>२) अक्षय रमेश निकम वय- २२ वर्षे व्यवसाय- शेती रा- गणपतराव खेडकर आळी, नवेखेड ता-वाळवा जि-सांगली मो.नं- ८७६७५३४६७६ |
| **अटक तजवीज** | यातील आरोपी क्र. १ व २ यांना दि.०८/१२/२०२४ रोजी २२.०५ वा. अटक करण्यात आली असून सध्या मा. न्यायालयीन कस्टडीमध्ये आहेत. |
| **गु.घ.ता.वेळ, ठिकाण** | दि.०५/१२/२०२४ रोजी सकाळी ०८.०० वा चे सुमारास फिर्यादीचे शेताशेजारी अशोक निकम यांचे घरासमोर |
| **गु.दा.ता.वेळ** | दि. ०५/१२/२०२४ रोजी २२.३४ वा. |
| **वापरलेले हत्यार** | लोखंडी कोयता |
| **जप्त हत्यार** | दोन लोखंडी कोयते (निवेदन पंचनाम्यादवारे) |
| **जखमी** | १. राजाराम सदाशिव निकम रा-जुनेखेड ता-वाळवा जि-सांगली<br>२. अशोक सदाशिव निकम रा-जुनेखेड ता-वाळवा जि-सांगली |
| **गुन्हयाची हकिकत** | दि.०५/१२/२०२४ रोजी सकाळी ०८.०० वा. चे सुमारास फिर्यादी सौ. अर्चना राजाराम निकम या जनावरांच्या धारा काढण्याकरीता जात असताना जुनेखेड, मळीभाग येथील अशोक निकम यांचे घरासमोर आल्या असता त्यांचे शेताशेजारचे शेजारी आरोपी नामे रमेश शंकर निकम व अक्षय रमेश निकम यांनी शेतीच्या बांधच्या हददीच्या कारणावरून व जुन्या भांडणाच्या कारणावरून फिर्यादीस शिवीगाळ दमदाटी करून फिर्यादीचे पती राजाराम निकम यांचे डोक्यामध्ये आरोपी नामे अक्षय रमेश निकम याने लोखंडी कोयत्याने वार करून गंभीर जखमी केले व आरोपी नामे रमेश शंकर निकम याने त्याचे हातातील लोखंडी कोयत्याने राजाराम निकम यांचे मानेवर, डाव्या हाताच्या मनगटावर व उजवे हाताचे तर्जनीवर मारहाण करून गंभीर जखमी केले आहे. म्हणुन फिर्यादी यांची त्याचेविरूद्ध तक्रार आहे. |

R 8 R
दि. २१/१२/२४